सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ**:- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण- ११२५/ प्र. क्र.३७२/ विशा-३ (अ), दि.१३/०२/२०२६

**विषय**:- अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, महाराष्ट राज्य, पुणे कार्यालयास (२०५५A०३१९) लेखाशीर्षाखाली उदिष्ट निहाय निधीच्या वितरणास मान्यता देण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण- ११२५/ प्र. क्र.३७२/विशा-३ (अ), दि.१३/०२/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०२१३१३०९३५७०२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 16-02-2026 16:55:27

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयास (२०५५A०३१९) या लेखाशीर्षाखाली उद्दिष्ट निहाय निधीच्या वितरणास मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-११२५/प्र.क्र.३७२/विशा-३(अ)**
मंत्रालय, मुंबई-४०००३२
तारीख: १३ फेब्रुवारी, २०२६

**संदर्भ :-**

विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र दि.०९.०१.२०२६ व दि.२८.०१.२०२६

**प्रस्तावना :-**

विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, पुणे येथील कार्यालयातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी वेतन, बक्षीस, दूरध्वनी/वीज/पाणी, देशांतर्गत प्रवास, कार्यालयीन खर्च, भाडेपट्टी व कर, संगणक खर्च, इतर खर्च व जाहिरात व प्रसिध्दी याबाबीसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासनास विनंती केली होती. त्यानुसार सदर बाबीसाठी निधी उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीत तरतूदीतून लेखाशीर्ष मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस (००) १०१, गुन्हे अन्वेषण व दक्षता (००)(०७) अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स कार्यालय, (अनिवार्य) (२०५५ A ३१९) या लेखाशीर्षतंर्गत खालील उद्दिष्ट निहाय निधी विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना उपलब्ध करून देण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | उद्दिष्ट | निधी |
|---|---|---|
| १ | ०१-वेतन | **रू.१,५०,००,०००/-** |
| २ | ०५-बक्षिस | **रू.१,४०,०००/-** |
| ३ | ०६-वीज/पाणी/दूरध्वनी | **रू.२,४०,०००/-** |
| ४ | ११-देशांतर्गत प्रवास | **रू.२,००,०००/-** |
| ५ | १३- कार्यालयीन खर्च | **रू.१४,००,०००/-** |
| ६ | १४-भाडेपट्टी व कर | **रू.२,४०,०००/-** |
| ७ | १७- संगणक खर्च | **रू.१४,००,०००/-** |
| ८ | २० इतर खर्च | **रू.१,४०,०००/-** |
| ९ | २६-जाहिरात व प्रसिध्दी | **रू.३५,०००/-** |

२.  सदर निधी आहरित करण्यासाठी विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, पुणे  हे "नियंत्रण अधिकारी" तसेच त्यांच्या अधिनस्त कार्यालयाचे वरिष्ठ कार्यालय अधीक्षक/प्रशासकीय अधिकारी अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, पुणे हे "आहरण व संवितरण अधिकारी"असतील.

३.  उपरोक्त निधी खर्च करतांना वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०७.०४.२०२५ नमूद करण्यात आलेल्या परिच्छेद ५ ते १९ मधील मार्गदर्शक सूचना व परिशिष्टामधील मार्गदर्शक सूचनाचे काटेकोर पालन करावे व वेळोवेळी विहीत विवरणपत्रात उपयोगिता प्रमाणपत्र सादर करावे.

४.  सदर शासन निर्णय वित्त विभाग/ व्यय-७ च्या अनौपचारीक संदर्भ क्र.१००/२०२६ दि.०३.०२.२०२६ तसेच वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.२९.०१.२०२६ अन्वये प्राप्त मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

५.  सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०२१३१३०९३५७०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

YAMUNA DHANANJAY JADHAV

Digitally signed by YAMUNA DHANANJAY JADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=2C3DF382DDA9F94D60DC0EA9D4827D801C6EDC144E58FFD58ED3EF2FE7FB16A5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F6CCE4E8E68DFB65BCD1BA4CE35CF82E2B05A7DDC3056B9285E5C75F146B1EEA, cn=YAMUNA DHANANJAY JADHAV
Date: 2026.02.13 13:10:37 +05'30'

**( यमुना जाधव )**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. सह/उप सचिव (कार्यासन बीयुडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३
४. महालेखापाल,महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा),मुंबई /नागपूर.
५. अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई.
७. कक्ष अधिकारी,व्यय -७, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवडनस्ती /विशा-३(अ)